सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २५० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

युवा आदर्श

## भीम स्मारक ...

बाबासाहेबांचे भव्य
मना मनात स्मारक
बदलून गेले आयुष्य
ते मुर्तीमंत उध्दारक
सद् विचारांचान्यास
बनविले अभ्यासक
पाया असता भक्कम
जीवन हो विश्वासक
मुखकमल तेजाळले
चरित्र हो मनमोहक
संघर्ष कराया सज्ज
परिस्थिती ती दाहक
असे असावे स्मारक
नाही विवाद नाहक
बाबा गुणांचा खजिना
संतृप्त संतुष्ट ग्राहक
हृदयाची जागा माझी
तेच रे संपूर्ण मालक
लेकरे निळ्या सूर्याची
तेजचं आमचे पालक
स्मारकाची रूंदीउंची
भलती आश्चर्यकारक
भीम विचाराशी जोडे
रे अंतर्मनातले दोरक
उपकार फिटणार ना
अपुरे आपले जीवक
भिमराव पूर्ण विश्वाचे
का भांडतो मी नाहक

शेती विषयक
(भीम विचार ) ...

त्या काळी भिमराव
जाणे शेतकरी व्यथा
ब्रिटीशासमोरमांडली
खडतर स्थिती कथा
भाव नाही शेतमाला
मेहनत सगळी वृथा
विचारअसे मौल्यवान
जाणीव होते रे आता
जल नियोजन करावे
दुष्काळ लढणे करता
जलतज्ञ संबोधी तया
उपकार त्यांचे स्मरता
करे शेतकरी संघटना
हक्काचा लढा लढता
रे दलाल व्यापा-यांनो
बळीराजा का नडता
शेतीकरे सामुदायिक
विचारात हवी दृढता
तांत्रिक यांत्रिक शेती
उगा परंपरेत कुढता
खोती पध्दती संपली
जाचातून होई मुक्तता
पोषक बनवले कायदे
कायदा मंत्री असता
जाहीरनाम्या पक्षाच्या
दाखवला प्रगती रस्ता
पोशींदा सुखी बनावा
पुष्कळ खाल्या खस्ता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.




विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद

# नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियान

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील गरजू नागरिक आपल्या वार्डातील अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. १५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या सम ाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी विभागीय आयुक्त संवाद साधणार आहेत.

विभागीय आयुक्त श्री गावडे यांच्या संकल्पनेतून 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' या उपक्रमाची सुरूवात झाली आणि संपूर्ण प्रशासन थेट गावात पोचले. या उपक्रमाच्या यशानंतर विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी म राठवाडा विभागातील आठही जिल्हयातून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय कामानिमित्त येण्यासाठी नागरिकांना होणारा त्रास थांबविण्यासाठी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे 'संवाद मराठवाडयाशी' या उपक्रमाची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता विभागीय आयुक्त श्री गावडे नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या सम ाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. श्री. गावडे यांच्यासमवेत यावेळी विभागीय पातळीवरील प्रशासकीय अधिकारी उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरपरिषद सह आयुक्त देविदास टेकाळे, नगर प्रशासन विभागाच्या लिस पोरे, संजय केदार उपस्थित असणार आहेत.

प्रत्येक आठवडयात संवाद साधला जाणार आहे. प्रत्येक संवादावेळी प्रशासकीय विभाग व विषय ठरविण्यात येणार असून यावेळी नगर विभाग विभागाच्या सबंधित विषयावर विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

नागरिकांनी नगर विकास विभागाशी सबंधित योजना, प्रश्न, असलेल्या अडचणी, योजनेच्या अंमलबजावणीचे धोरण तसेच याबाबत असलेल्या अडचणीबाबत थेट विभागीय आयुक्त यांच्याशी संवाद साधता येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे अवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

याबाबतचा क्युआर कोडही प्रसिदध करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

# काँग्रेस पक्षाची आढावा बैठक

## पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी उपस्थीत रहावे - देशमुख

**जालना । प्रतिनिधी** - आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक व जालना जिल्ह्यातील विधानसभा निहाय दि १६ एप्रिल रोजी होणाऱ्या संघटनात्मक आढावा बैठकीस काँग्रेसचे आजी - माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी केले आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार दि १६ एप्रिल रोजी जालना जिल्हातील भोकरदन, बदनापूर, घनसावंगी,जालना व परतुर विधानसभेतील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणूक तयारी व पक्ष संघटनात्मक आढावा बैठकीचे आयोजन पक्षाचे निरीक्षक माजी आ.राजेश एडके यांच्या अध्यक्षतेखालील व खा.डॉ कल्याणराव काळे, जिल्हा प्रभारी मा.आ.नामदेवराव पवार, सहप्रभारी ड अनिल मुंडे,सेवादल प्रदेशाध्यक्ष विलास औताडे,आ. राजेश राठोड,प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा मा.आ. कैलास गोरंट्याल, प्रदेश सरचिटणीस ड राम कुराडे,ओबीसी राष्ट्रीय समन्वयक राजेंद्र राख यांच्या प्रमुख उपस्थितीत दि १६ एप्रिल बुधवार रोजी सकाळी १० वा. भोकरदन- जाफराबाद विधानसभेची बैठक काँग्रेस कार्यालय, सिल्लोड रोड, भोकरदन येथे व सकाळी ११:३०वा. बदनापुर - अंबड विधानसभेतील पान ३ वर

# जय बजरंग फाउंडेशनच्या वतीने हनुमान चालीसा व लाडू वाटप



**जालना । प्रतिनिधी** - हनुमान जयंती उत्सवा निमित्त जय बजरंग फाऊंडेशनच्या वतीने शनिवारी ( ता. १२) जालना शहर आणि जिल्ह्यात विविध ठिकाणी असलेल्या हनुमान मंदिरांमध्ये हनुमान चालीसा व लाडूंचे वाटप करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष विपुल रॉय, उपाध्यक्ष विनोद राऊत, जिल्हाध्यक्ष उमेश कुटे, शहराध्यक्ष किशोर कुरील, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा सचिव अशोक पडुळ, विकी हिवाळे, प्रेम गायकवाड,संतोष सिंग, अश्विन ससाने, तोषु सिंग, गजानन खोतकर, यश राजपूत,यांच्यासह पदाधिकारी, युवक आणि भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान भक्ती आणि शक्तीचे प्रतीक असलेल्या हनुमानाचा आदर्श युवक, बालकांना कळावा, हनुमान चालीसांचे पठण केल्यामुळे होणारे फायदे समजून मुखोद्गत व्हावी, या हेतूने हनुमान जयंती उत्सवा निमित्त जय बजरंग फाउंडेशन च्या वतीने उपक्रम राबविण्यात आला. असे अध्यक्ष विपुल रॉय यांनी सांगितले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती निमित्त 'जयभीम पदयात्रा' उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती निमित्ताने जिल्हा प्रशासन, सर्व शैक्षणिक संस्था, एनएसएस, एनसीसी, एनवायके यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयात आज जयभीम पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

जालना शहरात जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरु युवा केंद्र, जिल्हा परिषद, विविध क्रीडा संघटना, मंडळे यांच्या विद्यमाने दि. १३ एप्रिल २०२५ सकाळी ०७.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ( नुतन वसाहत ) येथे पुष्पहार अर्पण करून पदयात्रा सुरुवात करण्यात आली. ही जयभिम पदयात्रा शनि मंदीरा पासून सुरु होवून - गांधी चमन-




डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (मस्तगड) यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून संपन्न झाली. यावेळी पदयात्रेस श्रीमती आरती चिल्लारे, सिद्धार्थ कदम क्रीडा मार्गदर्शक जिम्नॅस्टिक संतोष प्रसाद वरिष्ठ लिपिक , गुणवंत जिल्हा क्रीडा मार्गदर्शन तथा तायक्वांदो असो. चे अध्यक्षअरविंद देशमुख, गटशिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र काकडे अधिकारी श्री काकडे, श्री. पवार स्काऊट गाईड, जयपाल राठोड, राहुल गायके, जि. प. प्राथमिक प्रशालाचे मुख्याध्यापक व विद्यार्थी सरस्वती भवन माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला शिक्षक वृंद व विद्यार्थीहेविद्यार्थिनी आदी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# संपादकीय

पान

## डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता!

विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, म हिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे. डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'म ूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले. इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेम ध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते. पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# महिलांचे उध्दारकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

सोमवार १४ एप्रिल रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वि जयंती आहे. १४ एप्रिल १८९१ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलमाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. म ातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीम ूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंम लबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषांइतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी म हिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली



कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील सम ान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण

विश्वरत्न महामानव, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची उद्या १३४ वी जयंती. १४ एप्रिल १८९१ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादनन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दीन दलीत, उपेक्षित, वंचित वर्गासाठी, महिलांच्या कल्याणासाठी घालवले. या वर्गासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य केले ते सर्वांनाच माहीत आहे मात्र डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे कार्य हे इतपतच मर्यादित नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा, मानववंश शास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा अनेक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली. मात्र डॉ बाबासाहेब आबेडकरांनी देशाच्या अर्थशास्त्रात आणि जल धोरणात महत्वाची भूमि का बजावली हे खूप कमी लोकांना माहीत आहे. आज महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दर दोन वर्षांनी राज्यावर दुष्काळाची गडद छाया पसरते या वर्षीही राज्यावर किंबुहूना देशावर दुष्काळाचे सावट आहे अशावेळी बाबासाहेबांच्या जलधोरणाची आणि त्याच्या अमंबजावणीची किती गरज आहे याची प्रकर्षाने जाणीव होते. देशाची जलनीती, दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. आपल्या देशात जो पाऊस पडतो तो ठराविक कालावधीत म्हणजेच मोसमात पडतो. जून ते सप्टेंबर हा आपल्याकडे पावसाचा मोसम समजला जातो कारण याच चार महिन्यात आपल्याकडे पाऊस पडतो म्हणून त्याला मोसमी पाऊस म्हणतात. या चार महिने पडणाऱ्या पावसावरच आपली शेती अवलंबून आहे. आपला देश कृषीप्रधान देश आहे जर या चार महिन्यात पुरेसा पाऊस झाला नाही तर त्याचा परिणाम आपल्या शेतीवर पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. दुसरी बाब म्हणजे आपल्या देशात सर्वत्र सारखाच पाऊस पडतो असे नाही काही भागात धो धो पाऊस कोसळतो तर काही भागात पाऊसच पडत नाही. पावसाच्या विषम प्रमाणामुळे देशात एकाच वेळी काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य तर काही भागात अती पाऊस झाल्याने पूर जन्य परिस्थिती असे चित्र दिसते. पावसाच्या या लहरिपणाचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. निसर्गावर आपले नियंत्रण नाही मात्र पाण्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करून या संकटावर म ात करता येऊ शकते हे बाबासाहेबांनी जाणले होते. २० जुलै १९४२ रोजी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी म जूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांचा व्हॉईसरॉय कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांच्याकडे श्रम, जलसिंचन आणि वीज हे विभाग सोपवण्यात आले. दुसऱ्या महायुध्दानंतरचे व्यापक विकासाचे धोरण सिंचन व वीज या विषयावर तपशीलवार धोरण तयार करण्यासाठी बाबासाहेबांनी पुढाकार घेतला. १९३५ च्या कायद्यानुसार श्रम विभागाने सिंचन व वीज विकासासाठी मुख्यत्वे तीन गोष्टी कार्यान्वित करण्याचे ठरले.

१) एकापेक्षा दोन राज्यात वाहणाऱ्या नद्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करणे

२) राज्यांमधील नद्यांवर पाणी व जल विद्युत ऊर्जा संपत्ती निश्चित करणे

३) शासकीय व तांत्रिक विकास करण्यासाठी राष्ट्रीय धोरण काय असावे ? या गोष्टींचा समावेश होता.



घटना तयार करतानाही बाबासाहेबांनी घटनात्मक तरतुदी करून ठेवल्या. बाबासाहेबांनी घटनेचा आराखडा घटना समितीस सादर करताना पाणी हा विषय केंद्र शासनाच्या अख्त्यारीत असावा अशी भूमिका मांडली. बाबासाहेबांनी घटनेत पाणी हा विषय क्रमांक ५६ मध्ये अंतर्भूत केला त्यामुळे केंद्र शासनाला पाण्यासंबंधी कायदा करण्याचे अधिकार मिळाले. भारताच्या राज्यघटनेत ही तरतूद कलम २६२ मध्ये समाविष्ट करण्यात आली. याच तरतुदी अंतर्गत आंतरराज्य जलविवाद कायदा नदिखोर प्राधिकरण कायदा १९५६ पारित करण्यात आला. नोव्हेंबर १९४५ मध्ये कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत बाबासाहेबांनी अत्यंत मौलिक विचार देशाला दिले. पाणी आणि महापूर विनाशकारी आहे असे गृहीत धरून सुचवू नका. देशामध्ये एवढे पाणी उपलब्धच नाही की जे हानिकारक ठरू शकेल. भारतीय जनतेला पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त कष्ट सोसावे लागतात. जास्त पाण्याच्या उपलब्धेम ुळे नाही. पाणी राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे पावसाळ्यात पडणाऱ्या असमतोल पावसामुळे पुराच्या जास्त पाण्याविषयी तक्रार करण्यापेक्षा या पुराच्या पाण्याचा मनुष्याच्या विकासासाठी धरणे बांधून कसा उपयोग करता येईल हा दृष्टिकोन बाळगला पाहिजे. त्यामुळे जिथे पुरामुळे नुकसान होत असते त्या नद्यांवर ठिकठिकाणी धरणे बांधून हे पाणी सम ुद्राला जाऊ न देता विकासा साठी वापरणे इष्ट ठरेल असे विचार बाबासाहेबांनी मांडले होते. बाबासाहेबांच्या या विचाराने प्रभावित होऊन केंद्रीय जलमार्ग, पाटबंधारे, नौकायन आयोगाचे अध्यक्ष ए. एन. खोसला यांनी म हानदिवरील बहुउद्देशीय विकास प्रस्तावावर बाबासाहेबांशी चर्चा करून हिराकुड धरणाची अमंबजावणी केली. कटक येथील पाणी परिषदेत बाबासाहेबांनी मांडलेल्या विचारांची अमंबजावणी झाली असती तर आज पडणारा दुष्काळ पडला नसता. आज नदी जोड प्रकल्पाची जी संकल्पना मांडली जात आहे ती संकल्पना मूळची बाबासाहेबांचीच होती हे खूप कमी लोकांना माहीत आहे. ज्या समाजाला हजारो वर्ष पाण्यापासून दूर ठेवले त्याच सम ाजातील बाबासाहेबांनी देशवासीयांना मुबलक पाणी व वीज मिळावी यासाठी प्रयत्न केले. बाबासाहेबांशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत इतका सखोल विचार कुणी केला नाही आणि दूरदृष्टीपणा दाखविलेला नाही आणि म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने देशाचे हितचिंतक ठरतात.

**श्याम ठाणेदार, ९९२२५४६२९५**

# सक्षम राष्ट्रनिर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विशेष योगदान

विश्वरत्न डॉ, बाबासाहेब आंबेडकर हे सर्व मानवजातीसाठी आदर्श आहेत,म्हणून कित्येक देशांत त्यांना ज्ञपेुश्रशवसश ेष ूालेश्र म्हणजेच 'ज्ञानाच प्रतीक' असे म्हटले जाते,अशा या महामानववाचे भारताच्या विकासात असलेले योगदान जाणून घेणे महत्वाचे आहे,

संविधान निर्मिती सोबतच आधुनिक भारत घडवण्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यापक असे योगदान दिले, तेच आपण या लेखातून जाणून घेणार आहोत

सक्षम राष्ट्रिर्मितीमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध भूमिकांचे थोडक्यात **विश्लेषण :-**

बहुजनांच्या हक्कांसाठी लढणारे बहुजन नायक-

शतकानुशतके अस्पृश्यतेचे जीवन जगणारे महार,मातंग, आदिवासी,भटक्या विमुक्त जाती इत्यादी अनेक खालच्या थरातील जातीच्या लोकांना कुठलेच म ानवी अधिकार नव्हते, जसे, शिक्षणाचा, चांगल्या राहणीमानाचा, नौकरीचा ,व्यवसायाचा इत्यादी हे सर्व अधिकार सविधानामार्फत मिळवून दिले महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी,

स्वतंत्र मतदार संघाची स्थापना करून सर्वांना समान मतदानाचा अधिकार मि ळवून दिला जेणेकरून आपण आपला प्रतिनिधी निवडून दिला पाहिजे, केवढा हा दुरदृष्टिकोन !

शैक्षणिक कार्य-: डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेमुळे १४ वर्षाखालील मुलाम ुलींना मोफ़त सक्तीचे शिक्षण मिळण्याची तरतूद करण्यात आली, म्हणून आजही अनेक गरीब कुटुंबातील मुले शिक्षणाचा लाभ घेत आहेत, 'गाव तिथे शाळा' या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक गावात सरकारी शाळा स्थापन करण्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनीच पुढाकार घेतला,

तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचावे म्हणून ' पीपल्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली, आज याच्या ३० पेक्षा जास्त महाविद्यालये आहेत,छत्रपती संभाजी नगरमधील मि लिंद कॉलेज आणि त्याच्या विविध शाखा आजही कार्यरत आहेत,

हिंदुकोडबील- स्त्रियांविषयी चे कायदे म्हणजे हिंदुकोडबील, यात स्त्रियांना नौकरीत समानता,वडीलांच्या संपत्तीत वारसा हक्क, घटस्फोटाट,पतीच्या मिळकतीत हक्क इत्यादी, इतकेच काय प्रसूती दरम्यानच्या पगारी सुट्ट्या,स्त्रियांबद्दलइतका भावणीकतेने विचार केलेला पहिला महामानव म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर,

शेतकऱ्यांना हिताचे धोरण-:

खोतीप्रथा विरोधी शेतकऱ्यांचे आंदोलन करून ती प्रथा बंद पाडणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे किती दुरदृष्टिकोन ठेवणारे होते हे पुढील कार्यावरून लक्षात येते, जमीनदारी नष्ट करून मोठया प्रमाणात शेतजमिनीचे वाटप करून ज्यांना राहायला स्वतःच्या मालकीची जागा नवती त्यांना ते देऊन ''कसेल त्याची शेती'' हे धोरण अवलंबले, शेतकऱ्यांसाठी बी- बियाणे ,खते, कर्ज व कृषिउत्पन्न बाजार समित्यांची निर्मिती करण्यास हातभार लावनारे डॉ बाबासाहेब आंबेडकर शेतकऱ्यांचा किती खोलवर विचार करणारे होते हे दिसून येते,

जलप्रकल्पांची निर्मिती :-

भविष्याचा विचार करून अनेक जलप्रकल्प राबवणारे डॉ, बाबासाहेब आंबेडकरांनी दामोदर प्रकल्प, हिराकुंड प्रकल्प आणि नर्मदा प्रकल्प इत्यादी अनेक प्रकल्पाचे काम मार्गी लावून अनेक नद्यांना जोडण्याचे काम केले, ते भविष्यात पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठीच,

उर्जाधोरण -;

वीजक्षेत्र हे सरकारीच असले पाहिजे, त्याचे खाजगीकरण होऊ नये, कारण खाजगीकरण झाल्यास सामान्य जनतेला वीजदर परवडणार नाही,म्हणून १९४८ साली 'केंद्रीय विद्युत प्राधिकरनाची' स्थापना करून संपूर्ण भारतीयांना कमीतकमी दरात वीज पुरव्न्याचे कार्य सुरू झाले ते केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेमुळेच, !

*७** कामगारांविषयीचे धोरण -:

खाणीत १२ ते १४ तास काम करणारे कामगार व इतर ठिकाणी काम करणारे कामगार यांच्या कामाच्या तासात कमी करून ते केवळ ६ ते ८ तास करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ कामगारांसाठी नव्हे तर सर्वसामान्यांचे सुद्धा उधारकर्ते झालेत,

अशाप्रकारे सक्षम राष्ट्रिर्मितीमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका महत्वाची ठरली आहे,, म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ' आधुनिक भारताचे शिल्पकार ' असेही म्हटले जाते. धन्यवाद ! जयभीम

**नम्रता खंदारे**
**(शिक्षिका)**
**न्यू वंडर इंग्लिश स्कूल, परतुर**
**जिल्हा - जालना**

# बुध्दीमत्ता,कौशल्य व ज्ञाणाचा अथांग महासागर; भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजेत.स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ,तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुर्यासारखे लखलखायला लागले. जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले व लोकशाही निर्माण केली.आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो.आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते.परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली. कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे.परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद,पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले.आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते. कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे.त्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही.त्याची तुलना सम द्रापेक्षाही अफाट आहे.कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करू शकले नाही.आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने खूप श्रीमंत होते.आज प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे.कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे. त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो.परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे.याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर,ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी व विचारवंत देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु गेल्या काही वर्षांत मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वामम ार्गाने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती कमवुन देशाच्या १४० कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे.याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असेल.स्वतःला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी. असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल.कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे.त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे.कारण दिवसेंदिवस निसर्गाचा ह्यास होत आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर



आहे.त्यामुळे १४ एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जागृत हनुमान मंदिरात हनुमान जयंती उत्साहात साजरी



**मंठा । प्रतिनिधी -** शहरासह तालुक्यात हनुमान जयंती शनिवारी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त ठिकठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सुगंधा नगर येथील जागृत हनुमान मंदिरात सजावट करून हनुमान जयंती उत्सव साजरा करण्यात आला.सुगंधानगर परिसरातील जागृत हनुमान मंदिरात हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त जागृत हनुमान मंदिर समितीच्या वतीने महाप्रसादचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी हनुमान चालिसा पठण, भजने आदी कार्यक्रम सुरू झाले. सकाळपासून भाविकांनी म ारुती मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती. जन्मोत्सवानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शहरात ठिकठिकाणी बालगोपाळांनी हनुमान जयंती उत्साहात साजरी केली.

पान १ वरुन

## काँग्रेस पक्षाची ...

बैठक ,पाथ्रीकर कॅम्प, बदनापूर येथे आणि दुपारी १ वा.जालना विधानसभेची बैठक हॉटेल अंबर जालना येथे तर दुपारी ४ वा परतुर-मंठा व घनसावंगी विधानसभेतील बैठक छ.शिवाजी महाराज, चौक,मंठा येथे आयोजित करण्यात आली असून या विधानसभानिहाय संघटनात्मक आढावा बैठकीस जालना जिल्हातील काँग्रेसच्या सर्व आजी माजी प्रंटल, सेल, विभागाचे जिल्हाध्यक्ष, तालुका अध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्व माजी पदाधिकारी,सदस्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन काँग्रेस जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) राजाभाऊ देशमुख व शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद यांनी केले आहे.



# संत बाळूमामा यांचा उपदेश म्हणजे न्याय, नीति आणि धर्माचा मार्ग

## माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

**परतूर । प्रतिनिधी** - संत बाळूमामा यांचा उपदेश म्हणजे न्याय, नीति आणि धर्माचा मार्ग होय. त्यांनी लोकांना चांगला जीवन जगण्याचा आणि परमेश्वराची भक्ती करण्याचा मार्ग दाखवला. ते नेहमी लोकांना 'सत्य, प्रेम आणि नम्रता' या मूल्यांचा आदर करायला सांगत होते. बाळूमामा लोकांना नेहमी सत्य बोलण्याचा आणि एकमेकांवर प्रेम करण्याचा उपदेश करत होते. त्यांनी लोकांना धार्मिक विधी आणि पूजा नियमितपणे करण्याचा उपदेश दिला. संत बाळूमामायांनी लोकांना नम्र आणि विनम्र राहण्याचा उपदेश करत होते. ते म्हणत होते की, 'सत्य बोलणे आणि नम्रता बाळगणे म्हणजे देवाचे प्रेम मिळवणे'. असे संत बाळूमामा नेहमी सांगत असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

परतुर तालुक्यातील वाघाडी येथे संत बाळूमामा महाराज यांच्या मंदिरात आयोजित महाआरती व भारतीय जनता पक्षात शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश सोहळा कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, बाळूमामा लोकांना परमेश्वराची भक्ती करण्याचा उपदेश करत होते. ते म्हणत होते की, 'भक्ती म्हणजे देवाने आपल्यावर कृपा करणे'. संत बाळूमामांनी संसार त्यागून देवाच्या चरणी लीन होण्याचा मार्ग दाखवला. बाळूमामा लोकांना कल्याणासाठी आणि भल्यासाठी चांगले कर्म करण्याचा उपदेश करत होतेसंत बाळूमामा यांनी लोकांना देवाच्या मार्गावर चालण्याचा आणि चांगले जीवन जगण्याचा उपदेश दिला, ज्यामुळे ते आज देखील लोकांना प्रेरणा देत आहेत.

वाघाडी येथे आयोजित कार्यक्रम प्रसंगी संत बाळूमामा महाराज यांच्या मंदिरात आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आले. यावेळी आभार वृद्धांसह युवक व माता-भगिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. ढोल ताशांच्या गजरात आमदार बबनराव लोणीकर यांचे वाघाडीकर यांनी स्वागत केले गावात सर्वत्र भारतीय जनता पक्षाचे ध्वज लावण्यात आले तर गावातील प्रत्येक घरासमोर सडा रांगोळी काढत महिलांनी आमदार बबनराव लोणीकरांचे जोरदार स्वागत केले. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकडो तरुणांनी व नागरिकांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. राजकारणात अनेकांनी पक्ष सोडले परंतु आपण गेल्या ४० वर्षापासून एकाच पक्षात असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. एखादा मोठा किंवा छोटा कार्यकर्ता पक्ष सोडून गेला म्हणजे पक्ष संपत नाही मोठमोठ्या दिग्गजांनी वेगवेगळे पक्ष सोडले परंतु ते पक्ष संपले नाहीत. परंतु काही लोकांना ज्या ताटात खाल्लं त्याच ताटात माती टाकण्यात आनंद आहे. पक्षाने सर्व काही देऊनही गद्दारी करणाऱ्यांना सर्वसामान्य जनता कधीही माफ करत नाही ही बाब लक्षात घेतली पाहिजे असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतुर विधानसभा मतदारसंघाच्या २०० गावांमध्ये ३०० सभामंडप आपण बांधले आहेत मतदारसंघातील प्रत्येक गावाला डांबरीकरणाच्या रस्त्याने जोडले आहे वॉटर ग्रीड च्या माध्यमातून जनसामान्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न आपण केला आहे त्याचबरोबर २२० केवी, १३२ केवी, ३३ केवी च्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांचा ग्रामीण भागातील नागरिकांचा विजेचा प्रश्न देखील सोडवण्याचा प्रयत्न आपण केला आहे. गावागावात सिमेंट रस्ते बांधून पेवर ब्लॉक बसवून प्रत्येक गावाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत यापुढे देखील असे प्रयत्न करत राहू विधानसभेच्या निवडणुकी पूर्वी डांबरीकरणाचा रस्ता देण्याच्या आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले होते त्यानुसार जिल्हा नियोजन मंडळ अंतर्गत २.५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देत वाघाडी गावासाठी डांबरीकरणाचा पक्का रस्ता आमदार बबनराव लोणीकर यांनी उपलब्ध करून दिला त्याचबरोबर गावातील सिंचन वाढावे या उद्देशाने १.५ कोटी रुपयांचा कोल्हापुरी स्वरूपाचा बंधारा देखील मंजूर करण्यात आला असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले

मागील काळात जलयुक्त शिवार च माध्यमातून नदी व नाला खोलीकरण करून ग्रामीण भागातील पाण्याची पातळी वाढावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते तसे हे प्रयत्न यापुढे देखील सुरू राहतील. मतदारसंघातील अनेक गावांमध्ये सिमेंट बंधारे आणि कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधून गाव पातळीवरील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी सातत्याने आपण प्रयत्न करत आहोत या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विहिरीचे पाणी वाढणार असून शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी मदत होणार आहे. गाव पातळीवरील गावाच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजना असतात परंतु त्या योजना राबवता असताना अनेकांनी अडथळे आणण्याचा प्रयत्न केला परंतु आपण या सर्व अडथळ्यांना दूर सारून ग्रामीण भागाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

यावेळी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की मी शब्दाला जागणारा कार्यकर्ता आहे एखाद्या ठिकाणी शब्द दिला तर तो शब्द पूर्ण करण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करत असतो वाघडी व वाई या गावासाठी विधानसभेपूर्वी डांबरीकरणाचा पक्का रस्ता मंजूर करून देतो असा शब्द दिला होता त्यानुसार वाई व वाघाडी या दोन्ही गावांचे डांबरीकरणाच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे आपण आयुष्यात कधीही बोगस किंवा चुकीचे उद्घाटन केलेले नाही यापुढेही करणार नाही जिथे शब्द दिला तो शब्द पूर्ण करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असतो वाघाडीच्या ग्रामस्थांनी व माता-भगिनींनी केलेले अभूतपूर्व स्वागत विसरू शकणार नाही साधुसंत, संत बाळूमामा, गोरगरीब कार्यकर्ते, लाडक्या बहिणी यांचा कृपाशीर्वाद असल्यामुळे मी २५ वर्ष लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येऊ शकलो ही बाब मी कायम स्मरणात ठेवील.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत मतदारसंघातील एक लाख दहा हजार महिलांच्या खात्यात आपण सन्मान निधी जमा केला आहे, संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून दिव्यांग विधवा वयोवृद्ध दुर्धर आजार ग्रस्त अशा अनेकांना आपण मदत केली असून प्रधानमंत्री



किसान सन्मान योजना व नमो शेतकरी सन्मान योजना च्या माध्यमातून शेतकरी बांधवांना मदतीचा हात देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत यापुढे देखील प्रयत्न करत राहील. सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांच्या लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळे राज्यातील सरकार आले व मी देखील यांच्यात आशीर्वादामुळे पाचव्यांदा आमदार होऊ शकलो असे स्पष्ट केले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटिबद्ध असून गावातील कार्यकर्त्यांनी गावाच्या विकासासाठी जे जे काही आवश्यक असेल त्या सर्व बाबी टप्प्याटप्प्याने आपण पूर्ण करू असे आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित त्यांना दिले. यावेळी भाजपा परतूर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे उपसभापती संभाजी वारे पंचायत समिती सदस्य दिगंबर मोजले राम प्रसाद गिरी संदीप तनपुरे संजय अवचार यांच्यासह शेकडो युवा अबालवृद्ध माता भगिनी उपस्थित होत्या.

**आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकडो कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश**

वाघाडी येथे आयोजित संत श्री बाळूमामा महाराज यांच्या मंदिरात महाआरती व भारतीय जनता पक्षात शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश सोहळा आज पार पडला. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा संपूर्ण इतिहास कार्यकर्त्यांच्या समोर मांडला. अनेकांनी पक्ष सोडले परंतु आपण निष्ठापूर्वक आजही भारतीय जनता पक्षात आहोत अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी पक्षाविषयी असलेली निष्ठा व्यक्त केली यावेळी भाऊसाहेब टेहळे भीमराव डेहळे वैजनाथ टेहळे राम किसन टेहळे अंबादास वाघमोडे नारायण गाडे माऊली बोडके मारुती टेहळे भोसले महाराज श्रीराम गाडे रामजी माने शिवाजी अवचार शेषराव अवचार शंभू तात्या टिहळे एकनाथ अर्जुने प्रकाश मार्केड नंदकुमार राठोड बापूराव पवार भीमराव नाईक शिवाजी देशमाने यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.